सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२६-२०२७

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## क्रीडा व युवक सेवा संचालनालय

पुस्तक क्र. ३

शासकीय मुद्रणालय, वाई
२०२६

# शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने
# तयार केलेल्या कार्यक्रम अंदाजपत्रकांची यादी

| कार्यक्रम अंदाजपत्रकाचा क्रमांक | कार्यक्रम अंदाजपत्रकाचे नाव |
|---|---|
| १ ... ... ... ... ... ... | शालेय शिक्षण |
| २ ... ... ... ... ... ... | शालेय शिक्षण |
| ३ ... ... ... ... ... ... | क्रीडा व युवक सेवा संचालनालय |

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२६-२०२७

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(क्रीडा व युवक सेवा संचालनालय)

पुस्तक क्र. ३

# अ नु क्र म णि का

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ क्रमांक |


१. प्रस्तावना ... ... ... ... ... १

२. संचालनालयाची रचना ... ... ... ... ... ५

३. एकूण अर्थसंकल्पाचा कार्यक्रमनिहाय तपशील ... ... ... ... ... ६

४. कार्यक्रम

(१) संचालन व प्रशासन ... ... ... ... ... ७

(२) शारीरिक शिक्षण ... ... ... ... ... ७

(३) युवक कल्याण योजना ... ... ... ... ... ८

(४) क्रीडा आणि खेळ ... ... ... ... ... १०

५. एकूण अर्थसंकल्पाचे प्रधान शीर्ष, आर्थिक तरतूद आणि खर्च दाखविणारे विवरणपत्र

(१) संचालन व प्रशासन ... ... ... ... ... २५

(२) शारीरिक शिक्षण ... ... ... ... ... २६

(३) विद्यार्थ्यांकरिता युवक कल्याण कार्यक्रम ... ... ... ... ... २७

(४) विद्यार्थेत्तर युवक कल्याण योजना ... ... ... ... ... २८

(५) क्रीडा आणि खेळ ... ... ... ... ... ३२

६. संचालनालयांतर्गत कार्यालयातील मंजूर पदांचा तपशील ... ... ... ... ... ४०

७. लेखा आक्षेपांबाबतचे विवरणपत्र ... ... ... ... ... ४४

८. विकास मंडळ निहाय प्रत्यक्ष खर्च (अविभाज्य भाग) (योजनेत्तर योजना) ... ... ... ... ... ४५

९. मंडळनिहाय खर्चाची माहिती (योजनांतर्गत योजना) ... ... ... ... ... ४६

१०. गत ५ वर्षातील योजना निहाय खर्च तपशिल ... ... ... ... ... ५५

## प्रस्तावना

राज्य शासनाच्या शिक्षण प्रणालीमध्ये शारीरिक शिक्षण, क्रीडा आणि युवक सेवा यांचा समावेश केला जावा अशी मागणी सातत्याने स्वातंत्र्य-पूर्व काळापासून केली जात होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर सामान्य शिक्षणाच्या प्राप्तीबरोबरच आरोग्य, क्षमता आणि युवकांचे चारित्र्य आणि शरीर संवर्धन या गुणांची वाढ होण्यासाठी सामान्य शिक्षण प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल घडून यावेत अशा प्रकारची देशव्यापी जागृती शिक्षणविषयक धोरणात होत आहे. क्रीडा क्षेत्राचा महान वारसा असलेल्या महाराष्ट्राने तर, जुलै १९७० मध्ये, क्रीडा व युवक सेवेसाठी, स्वतंत्र संचालनालय स्थापून, क्रीडा क्षेत्रामध्ये, महाराष्ट्र भारतात अग्रेसर राज्य झाले आहे.

शारीरिक शिक्षण, क्रीडा आणि युवक सेवा विषयक विकासासाठी या संचालनालयांतर्गत खालील बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

### (१) संचालनालयांतर्गत येणाऱ्या बाबी खालीलप्रमाणे

(१) प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शैक्षणिक पातळीपर्यंत शारीरिक शिक्षणाचा समावेश व विकास करणे.
(२) शारीरिक शिक्षण, क्रीडा व रंजनाच्या शिक्षकांसाठी प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करणे.
(३) विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धा व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करणे.
(४) व्यायामशाळा, आखाडे, क्रीडा संस्था, क्रीडा मंडळे, विविध खेळांच्या संघटनांमार्फत खेळाचा प्रसार व प्रचार करणे.
(५) गिरीभ्रमण, गिर्यारोहण, सागरी जलतरण स्पर्धा, जलक्रीडा इ. साहसी उपक्रमांस प्रोत्साहन देणे.
(६) क्रीडा स्पर्धा आयोजित करणे.
(७) युवक कल्याण आणि युवक सेवा विषयक कार्यक्रमांचे आयोजन करणे.
(८) मुंबई शहरातील शासकीय मैदानांचे परिरक्षण व विविध खेळांचे क्रीडांगणांचा विकास करून व्यवस्था करणे.
(९) कुस्ती कलेचा विकास करणे.
(१०) क्रीडा विषयक सुविधा निर्माण करणे.

### (२) खेळ, क्रीडा व युवक विकासासाठी उत्तेजनार्थ आर्थिक सहाय्य

(१) शारीरिक शिक्षण, क्रीडा व मनोरंजनाच्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण.
(२) युवकोन्नती व विद्यार्थी यांच्यासाठी युवक सेवा उदा., बालवीर व वीरबाला आणि राष्ट्रीय छात्रसेना या स्वरूपाचे शिक्षण.
(३) विविध खेळ, क्रीडा आणि रंजन इत्यादी आयोजनाचा विकास.
(४) शारीरिक शिक्षण, क्रीडा व रंजन आणि आरोग्यशिक्षण इत्यादी विषयीच्या वाङ्मयाचे संवर्धन.
(५) वरील स्वरूपाच्या क्षेत्रांमध्ये संशोधनासाठी प्रोत्साहन देणे.
(६) व्यायामशाळा, आखाडे, क्रीडा संस्था, क्रीडा मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमात एकसूत्रता आणणे व अशा संस्थांना अनुदानाद्वारे प्रोत्साहन देणे.
(७) क्रीडा प्रेक्षागार जलतरण तलावाच्या बांधकामास प्रोत्साहन देणे.
(८) गिरीभ्रमण, गिर्यारोहण, सागरी जलतरण स्पर्धा, जलक्रीडा इ. साहसी उपक्रमांच्या आयोजनास प्रोत्साहन देणे.
(९) युवक कल्याण विषयक कार्यक्रम आयोजनास आर्थिक सहाय्य.
(१०) मुंबई शहरातील ओव्हल, क्रॉस, आझाद मैदानाचे परिरक्षण व खेळांच्या क्रीडांगणांचा विकास करून व्यवस्थापन करणे.
(११) राष्ट्रीय क्रीडा निधीसारख्या सार्वजनिक संस्थांचे संबंधित प्रशासकीय कामकाज.
(१२) कुस्ती कलेच्या विकासासाठी आर्थिक सहाय्य देणे.

क्रीडा व युवक सेवा संचालनाल्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वरील बाबी कार्यक्षमतेने व व्यवस्थितपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्यात मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर, लातूर, नाशिक, पुणे व अमरावती येथे विभागीय कार्यालये व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हा क्रीडा कार्यालये सुरू आहेत.

### (३) महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण

महाराष्ट्र शासनाने राज्याचे क्रीडा धोरण हे जून २०१२ मध्ये क्रीडा धोरणात ५८ विविध शिफारशी आहेत. सदर शिफारशीनुसार योजना निहाय सुधारित शासन निर्णय निर्गमनाची प्रक्रिया सुरू आहे.

मुंबई शहरासाठी स्वतंत्र विभागीय संकुले तसेच प्रभाग निहाय तालुके उभारावयाची आहेत.

राज्यात विभाग जिल्हा तालुका संकुले सुरू करण्याचे ठरविले आहे. त्याचप्रमाणे क्रीडा विद्यापीठांतर्गत १५ जुलै १९९६ पासून ११ क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्यात आलेल्या आहेत.

### (४) आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाची स्थापना :-

राज्यात क्रीडा विषयक मनुष्यबळ निर्माण करून राज्यातील तसेच देशातील खेळाडूंना अद्यावत खेळ प्रशिक्षण व अनुषंगीक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ महाराष्ट्र, पुणे स्थापनेस शासनाने मान्यता दिली आहे.

### क्रीडा हा शालेय अभ्यासक्रमाचा आवश्यक, अंगभूत व अविभाज्य भाग

इयत्ता १ ली ते ४ थी : शारीरिक हालचाली, मनोरंजनात्मक खेळ, निवडक देशी खेळांचे ज्ञान यावर भर.

इयत्ता ५ वी ते ८ वी : शारीरिक शिक्षण व क्रीडा यासाठी आठवड्यातून अर्धा दिवस.

इयत्ता ९ वी : छात्रसेनेचे प्रशिक्षण.

इयत्ता १० वी : शालांत परीक्षेमध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडाचे महत्त्व जागविणे.

खेळात प्राविण्य मिळविणाऱ्या शाळांना क्रीडा साहित्य विकत घेण्या-साठी, क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी व मानधनावर कुशल प्रशिक्षकांची नेमणूक करण्यासाठी आर्थिक सहाय्य.

खेळात रूची दाखविणाऱ्या, विशेषतः ग्रामीण, डोंगरी व आदिवासी भागातील ८ ते १४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना नैपुण्य चाचण्यांद्वारे क्रीडा प्रबोधिनीत प्रवेश.

शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासाठी शारीरिक शिक्षण व क्रीडाविषयक उजळणी वर्ग.

**क्रीडा प्रशिक्षणासाठी तालुका हा घटक**

टप्प्या-टप्प्याने तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना.

पहिल्या टप्प्यात निवडक तालुक्यांत प्रशिक्षण केंद्र.

प्रत्येक प्रशिक्षण केंद्रात किमान २०० मीटर धावपट्टी, कबड्डी व निवडलेल्या खेळांची मैदाने, प्रसाधनगृहे व कार्यालय.

**तालुकावार क्रीडा कृति आराखडे**

स्थानिक तज्ज्ञांच्या सल्ल्याने क्रीडा कृति आराखडे.

क्रीडा साधनसामग्री व सुविधा यांत सुधारणा व वाढ.

एकविध क्रीडा संघटनांची कार्यक्षमता वाढविणे.

प्रत्येक जिल्ह्याचा 'क्रीडानिधी' उभारण्यासाठी जिल्हा क्रीडा परिषदेची निर्मिती.

**क्रीडा विकास योजना**

**क्रीडांगण विकास अनुदान :** सर्वसाधारण भागातील संस्थांना अंदाजीत खर्चाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ७.०० लक्ष यापैकी कमी असेल इतकी रक्कम अनुदान म्हणून दोन हप्त्यात देय राहिल. आदिवासी व समाजकल्याण विभागांतर्गत चालवणाऱ्या शासकीय आश्रम शाळांना क्रीडा साहित्य खरेदी करणे, या बाबींव्यतिरीक्त मान्य असलेल्या बाबींकरीता १००% अनुदान रक्कम अथवा जास्तीत जास्त रु. ७.०० लक्ष यापैकी कमी असेल इतकी रक्कम अनुदान म्हणून देय राहील.

**राष्ट्रीय क्रीडा व खेळांसाठी संघ पाठविण्यासाठी राज्य संघटनांना अनुदान :** (१) खेळाडू भत्ता प्रतिदिन रू. १५०, (२) प्रत्येक खेळाडूसाठी ट्रॅकसूट रू. १,००० व गणवेश रू. ५०० दिला जातो.

**प्रशिक्षण शिबिरे संघटित करण्यासाठी राज्य संघटनांना वित्तीय सहाय्य :** खर्चाच्या ५०%, परंतु जास्तीत जास्त रू. १५,००० अनुदान दिले जाते.

**क्रीडा स्पर्धांचे आयोजन :**

| स्पर्धेचा स्तर | खेळ संख्या | अनुदानित खेळ संख्या | प्रत्येक खेळासाठी अनुदान (रू.) |
|---|---|---|---|
| शालेय क्रीडा स्पर्धा : | | | |
| तालुका स्तर | १० | १० | १०,००० |
| जिल्हा स्तर | ९३ | ४३ | १५,००० |
| जिल्हा स्तर | ६ | ६ | ३०,००० |
| जिल्हा स्तर-महानगरपालिका | ९३ | ४९ | — |
| विभाग स्तर | ९३ | ४९ | — |
| राज्य स्तर | ९३ | ४९ | नियमाप्रमाणे |
| राष्ट्रीय स्तर | ८४ | ४९ | नियमाप्रमाणे |

**राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना ट्रॅकसूट्स व गणवेश :**

राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना रू. १,००० पर्यंत ट्रॅकसूट व रू. ५०० पर्यंत गणवेश पुरविण्यात येतात.

**राज्यातील वयोवृद्ध खेळाडूंना मासिक मानधन :** (१) आंतरराष्ट्रीयस्तर (१) ऑलिंपिक/जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा रू. ६,०००/-(२) आशियाई अजिंक्यपद/एशियन गेम्स इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धा रू. ४,०००/- (३) राष्ट्रकुल स्पर्धा रू. ४,०००/- (४) अर्जुन पुरस्कार रू. ६,०००/- (२) राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत किमान ५ वेळा किंवा ३ वर्षात किमान एकदा पहिले/दुसरे/तिसरे अजिंक्यपद मिळविणाऱ्या खेळाडूंना रू. २,५०० (३) हिंदकेसरी/रुस्तम-ए-हिंद/महान भारत/भारत केसरी/महाराष्ट्र केसरी यांना वय व उत्पन्नाची अट न ठेवता रू. ६,००० दरमहा मानधन देण्यात येते.

**क्रीडा दिन २९ ऑगस्ट व क्रीडा सप्ताह (१२ ते १८ डिसेंबर) साजरा करणे :** प्रत्येक जिल्ह्यास रू. १०,०००, याशिवाय २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन (मेजर ध्यानचंद जन्म दिन) म्हणून साजरा करण्यात येतो.

**शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या शाळांना अनुदान :**

क्रीडा विभागामार्फत तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तर या क्रमाने शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या योजनेमध्ये जिल्हा-स्तर १४,१७,१९ वयोगटातील मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील खेळ निहाय कामगिरीनुसार गुण प्रदान करण्यात येऊन त्यानुसार प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक दिले जातात. सदर शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान अनुक्रमे रू. १.०० लाख, रू. ०.७५ लाख व ०.५० लाख दिले जातात. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तर शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त क्रीडा प्रकारात सहभागी होऊन पदक प्राप्त करणाऱ्या राज्यातील सर्वोत्कृष्ट तीन शाळा रू. २.०० लक्ष आणि आंतरराष्ट्रीय स्तर शालेय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम तीन क्रमांकापर्यंत प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या शाळेस रू. ७.०० लाख व ४ ते १० क्रमांकापर्यंतचे पदक विजेते खेळाडू तयार करणाऱ्या शाळांना रू. ३.०० लक्ष दिले जाणार आहे.

**क्रीडा कार्यालयांचा विस्तार :** (१) तालुका प्रशिक्षण केंद्रांच्या तालुक्यांत तालुका क्रीडा अधिकारी, (२) जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याचे पद वर्ग २ च्या ऐवजी वर्ग १ करण्यात आले आहे.

**अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य :** शासन निर्णयात नमूद अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागासाठी पात्र होणाऱ्या खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास व भोजन इत्यादी साठी खर्चाच्या ७५ % किंवा कमाल रु. १.०० लक्ष यापैकी कमी असेल ते अर्थसहाय्य क्रीडा प्रकार (वैयक्तीक/सांघिक) व स्पर्धा आयोजनाचे ठिकाण यावर अवलंबून राहील.

**महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद निधीतून आर्थिक सहाय्य : निर्वाह अनुदान :**

(अ) एकविध खेळाच्या राज्य संघटना-एकविध खेळाच्या राज्य संघटनेस राज्यातील किमान ५०% जिल्हा संघटना संलग्न असणे आवश्यक आहे. प्रत्येक जिल्हा संघटनेमागे रू. १,००० अथवा ग्राह्य बाबीवरील गतवर्षीच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% यापैकी जी रक्कम कमी असेल इतके अनुदान देण्यात येते.

(ब) एकविध खेळाच्या जिल्हा संघटना व जिल्हा क्रीडा परिषद-दरवर्षी कमाल रू. ५,००० अथवा ग्राह्य बाबींवरील गतवर्षीच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% यापैकी जी रक्कम कमी असेल इतके अनुदान देण्यात येते.

(क) स्थानिक स्तरावर एक किंवा अनेक खेळांच्या क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था, मंडळे, संघटनांना दरवर्षी कमाल रू. ५०० अथवा ग्राह्य बाबींवरील गतवर्षीच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% यापैकी जी रक्कम कमी असेल इतके अनुदान देण्यात येते.

**क्रीडा साहित्य अनुदान :**

(अ) एकविध खेळाच्या राज्य संघटनांना कमाल रू. ५,००० इतके अनुदान देण्यात येते.

(ब) एकविध खेळाच्या जिल्हा संघटना व जिल्हा क्रीडा परिषद यांना कमाल रू. ५,००० इतके अनुदान देण्यात येते.

(क) स्थानिक स्तरावर एक किंवा अनेक खेळांच्या विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था, इतर मंडळे व संघटनांना कमाल रू. २,००० अनुदान देण्यात येते.

**(ब) अधिकृत स्पर्धेच्या आयोजनासाठी तद्‍र्थ अनुदान :** (१) राज्यस्तरावरील स्पर्धा खर्चाच्या ५० टक्के परंतु जास्तीत जास्त रू. १ लाख, (२) राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा खर्चाच्या ५० टक्के परंतु जास्तीत जास्त रू. २ लाख अनुदान देण्यात येते.

**कुस्ती कलेच्या विकासासाठी कुस्तीगीरांना मानधन :** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेमार्फत आयोजित कुस्ती अधिवेशनातील (राज्य अजिंक्यपद स्पर्धा) माती, गादी, उदयोन्मुख (कुमार गट), ग्रीको रोमन वरिष्ठ गट व महिला या ५ प्रकारातील प्राविण्यप्राप्त (१ ते ३ क्रमांकावरील ४ खेळाडूंना) कुस्तीगीरांना वजनगटनिहाय वार्षिक मानधन देण्यात येते.

**खाजगी व सार्वजनिक उद्योजक व इतरांद्वारे खेळ दत्तक योजना** खेळ अथवा संघ दत्तक घेण्यासाठी उद्युक्त करणे.

क्रीडा प्रबोधिनी व मध्यवर्ती केंद्र यांच्या खर्चात सहभाग मिळविणे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वार्षिक अंदाजपत्रकात क्रीडासाठी किमान ५ टक्के रक्कम राखून ठेवण्याचे बंधन आहे.

**क्रीडा संस्कृतीची जोपासना या अंतर्गत महाराष्ट्राचे क्रीडा धोरण व युवक सेवा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी अस्तित्वात असलेल्या योजना व काही नव्या योजना पुढीलप्रमाणे आहेत :**

(१) व्यावसायिक प्रशिक्षणाच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमात राष्ट्रीय पदक विजेत्यांना थेट प्रवेश.

(२) क्रीडा प्रशिक्षण व स्पर्धा यामुळे झालेली अनुपस्थिती नियमित करण्याची सवलत.

(३) राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्राविण्य प्राप्त करणाऱ्या इ. १० वी व १२ वीच्या परीक्षेत वाढीव ५ ते २५ क्रीडा गुणांची सवलत देण्यात येते.

(४) राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेत्या खेळाडूंना राज्य शासकीय सेवेत ५% आरक्षण.

(५) श्री शिवछत्रपती, क्रीडा मार्गदर्शक, अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्यांना महाराष्ट्रात प्रवास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून विनामूल्य प्रवास सवलत.

(६) राष्ट्रीय स्पर्धांत राज्याचे प्रतिनिधित्व करून पदक मिळविणाऱ्यां-साठी शिष्यवृत्ती.

(७) अभियांत्रिकी संस्थांमध्ये क्रीडा सामग्रीच्या उत्पादनाचा अभ्यासक्रम. क्रीडा व्यवस्थापन, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा पत्रकारिता हे अल्प कालावधीचे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठांस प्रोत्साहन.

(८) क्रीडा मानद प्रशिक्षक नेमताना स्वतःचा व्यवसाय/नोकरी सांभाळून प्रशिक्षणाचे काम पाहण्यास मुभा.

(९) विदेशी प्रशिक्षकांची नेमणूक/मार्गदर्शनपर दौरे.

(१०) प्रसार माध्यमांद्वारे प्रसार व प्रचार.

(११) आधुनिक क्रीडा सुविधा, विविध कृत्रिम क्रीडांगणे व इतर केंद्र शासनाच्या योजनांचा राज्यातील संस्थांना जास्तीत जास्त लाभ मिळण्यासाठी विशेष प्रयत्न.

(१२) क्रीडा संस्था/मंडळे, क्लब यांना आर्थिक मदतीसाठी निकष व मार्गदर्शक तत्त्वे.

(१३) तालुका, जिल्हा व विभाग क्रीडा संकुल योजनेतून बंदिस्त व खुले प्रेक्षागृह, धावनपथ, खेळांची मैदाने, क्रीडा साहित्यासाठी हॉल, मीटर जलतरण तलाव, जिम हॉल, वसतिगृह इत्यादींसाठी तालुका क्रीडा संकुलासाठी ५.०० कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी २५.०० कोटी तर विभागीय क्रीडा संकुलासाठी ५०.०० कोटीपर्यंत आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

(१४) **व्यायामशाळा विकास अनुदान :** शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कार्यालये व रुग्णालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासनाद्वारे मान्यता दिलेल्या शैक्षणिक शाळा व महाविद्यालये, आश्रमशाळा व वसतिगृह, शासकीय जिल्हा रुग्णालये व उप-जिल्हा रुग्णालये, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, पोलीस कल्याण निधी, पोलीस विभाग जिमखाना इत्यादी संस्थांना अंदाजित खर्चाच्या १००% किंवा जास्तीत जास्त रू. ७.०० लाख यापैकी कमी असेल इतकी रक्कम एक रकमी अनुदान म्हणून मंजूर करण्यात येते.

(१५) जिल्हा/राज्य संघटनांना अधिक कार्यक्षम व गतिमान करण्या-साठी उपाययोजना म्हणून अनुदान देणे.

(१६) इतर राज्यांत व देशात महाराष्ट्राच्या खेळ परंपरेचा प्रसार व प्रचार तथा क्रीडा सुविधांची ओळख.

(१७) राज्य क्रीडा निधीची स्थापना.

(१८) मराठी भाषेत क्रीडा वाङ्मय निर्मिती करणे.

(१९) योग प्रशिक्षण योजना.

(२०) क्रीडा प्रबोधिनी व तालुका प्रशिक्षण केंद्रे उन्हाळ्याच्या सुट्टीत प्रशिक्षण शिबिरे घेण्यासाठी उपलब्ध.

(२१) क्रीडा साहित्यावर ऑक्ट्रॉय संपूर्णपणे माफ.

(२२) स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आमदार निधीतून रूपये १०.०० लाखापर्यंत व्यायामशाळा बांधकाम अन्य सुविधा व व्यायाम साहित्य करीता अनुदान देण्यात येते. आंतरराष्ट्रीय खेळाडूंना वैयक्तिक क्रीडा साहित्य खरेदी करीता रु. १.०० लक्ष मर्यादेत तसेच नोंदणीकृत क्रीडा मंडळांना क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी रु. ५.०० लक्ष मर्यादेत निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

क्रीडा मंडळे, क्रीडा संस्था यांना जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजना करिता रु. ५.०० लक्ष ते कमाल रु. १५.०० लक्ष मर्यादेत निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

(२३) **क्रीडांगणाची उपलब्धता**

(अ) संरक्षण भिंत/तारेचे कुंपण यासाठी योजना.

(ब) आरक्षित जागेचा वापर फक्त खेळांसाठी, समारंभ, प्रदर्शने भरविण्याच्या प्रवृत्तीवर कायदेशीर उपाययोजना.

(क) प्रत्येक गावात खेळासाठी जागा ठेवणे बंधनकारक.

(२४) **क्रीडा संकल्पनेची पूर्तता**

शिक्षण विभागाने कामकाजाच्या सोयीसाठी राज्याचे एकूण आठ विभाग केलेले आहेत. याच धर्तीवर क्रीडा स्पर्धेचे आयोजन व इतर योजना कार्यान्वित करण्यासाठी शिक्षण विभागाप्रमाणे ८ विभाग निश्चित केले असून प्रत्येक विभागासाठी उपसंचालक कार्यालय सुरू करणेस तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सध्या मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, नागपूर व अमरावती ही विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. तसेच वाशीम, नंदुरबार, हिंगोली व गोंदिया या नवीन चार जिल्ह्यांसाठी जिल्हा क्रीडा कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे.

(२५) राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्राविण्य प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्यात येते.

| | राष्ट्रीय | आंतरराष्ट्रीय |
|---|---|---|
| (१) सहभाग- | रू. ३,७५० | रू. ११,२५० |
| (२) प्रथम क्रमांक | रू. ११,२५० | रू. ३०,००० |
| (३) द्वितीय क्रमांक | रू. ८,९५० | रू. २२,५०० |
| (४) तृतीय क्रमांक | रू. ६,७५० | रू. १५,००० |

(२६) इयत्ता १० वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या खेळाडूंना इयत्ता ११ वी च्या प्रवेशासाठी ३% जागा आरक्षण.

(२७) आखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेसाठी सहभाग आणि अनुदान आयोजन.

(२८) सन २००४-०५ पासून भारतीय शालेय खेळ महासंघामार्फत आयोजित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात पदक-तालीके-मध्ये प्रथम तीन क्रमांक मध्ये अग्रस्थानी आहे.

(२९) महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंना खो-खो या खेळामध्ये खेळाची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी, यासाठी राज्यस्तरावर कै. भाई नेरूरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

(३०) महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंना व्हॉलीबॉल या खेळामध्ये खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी यासाठी राज्यस्तरावर व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

(३१) महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंनी कुस्ती या खेळामध्ये खेळण्यासाठी जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी, यासाठी राज्यस्तरावर स्व. खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

(३२) महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंना कबड्डी या खेळामध्ये खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी, यासाठी राज्यस्तरावर छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

## क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

### संचालनालयाची रचना




आस्थापनेवरील एकूण मंजूर पदे—६७८

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंना थेट नियुक्तीद्वारे शासनसेवेत समावून घेण्यासाठी नव्याने वर्ग १, २ व ३ ची एकूण ५५१ पदे निर्माण करण्यात आली असून त्यांची नियुक्ती प्रक्रीया सुरू झाली आहे.

## एकूण अर्थसंकल्पाचे प्रधान शीर्ष व कार्यक्रमनिहाय तपशील

(रूपये हजारांत)

| अ. क्र. कार्यक्रम | प्रत्यक्ष रकमा २०२४–२०२५ | अर्थसंकल्प २०२५–२०२६ | सुधारलेले अंदाज २०२५–२०२६ | अर्थसंकल्प २०२६–२०२७ |
|---|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ००१ संचालन व प्रशासन | ४२१५७२ | ५४६५१५ | ५४२१९५ | ६१६९९५ |
| १०१ शारीरिक शिक्षण | ९६४ | २५५७ | २४१९ | २८३१ |
| १०२ विद्यार्थ्यां- करिता युवक कल्याण कार्यक्रम | ८१३३६८ | १०२६६२९ | १११७५०८ | १०३९१६९ |
| १०३ विद्यार्थीतर युवक कल्याण कार्यक्रम | ४८१८६ | ११८१९७ | १६०८७५ | ११८१९७ |
| १०४ क्रीडा व खेळ | ५२२४९४७ | ५४२६४६४ | ९९९५१२४ | ५६४२६२३ |
| २२०४ क्रीडा व युवक सेवा | | | | |
| एकूण ... | ६५०९०३७ | ७१२०३६२ | ११८१८१२१ | ७४१९८१५ |

**टीप.**— महाराष्ट्र छात्र सेना ही योजना शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येते.

## १. संचालन व प्रशासन

### प्रस्तावनात्मक

राज्य शासनाच्या शिक्षण प्रणालीमध्ये शारीरिक शिक्षण, क्रीडा आणि युवक सेवा यांचा समावेश केला जावा अशी मागणी सातत्याने स्वातंत्र्य-पूर्व काळापासून केली जात होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर चारित्र्य आणि शरीर संवर्धन या गुणांची वाढ होण्यासाठी सामान्य शिक्षण प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल घडून यावेत अशा प्रकारची देशव्यापी जागृती शिक्षण-विषयक धोरणात होत आहे. क्रीडा क्षेत्राचा महान वारसा असलेल्या महाराष्ट्राने जुलै १९७० मध्ये क्रीडा व युवक सेवेसाठी स्वतंत्र संचालनालय स्थापन केले.

शारीरिक शिक्षण, क्रीडा आणि युवक सेवा या बाबींच्या कार्यवाही-साठी या संचालनालयाच्या मुख्य कार्यालयास प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींत निष्णात असलेला सनदी अधिकारी तसेच अन्य अधिकारी कर्मचारी वर्ग पुरविला आहे. तो खालीलप्रमाणे :–

संचालनालय स्तरावर आयुक्त/संचालक म्हणून भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची अथवा सहसंचालकांच्या पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येते. त्यांच्या हाताखाली मुख्यालयात सहसंचालक, तीन उपसंचालक, विशेष कार्य अधिकारी, तीन सहाय्यक संचालक, तसेच तालुका क्रिडा अधिकारी असून कार्यालयीन अधीक्षक, क्रीडा मार्गदर्शक, महिला क्रीडा अधिकारी, क्रीडा अधिकारी, मुख्य लिपिक, लघुलेखक (उच्च श्रेणी व निम्नश्रेणी), वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, वाहनचालक, नाईक, दफ्तरी शिपाई, पहारेकरी अशी पदे आहेत.

विभागीय स्तरावर उपसंचालक, अधीक्षक, क्रीडा अधिकारी, मुख्य लिपिक, वरिष्ठ लिपिक, लघुलेखक, कनिष्ठ लिपिक, वाहनचालक, शिपाई असे कर्मचारी आहेत.

जिल्हा स्तरावर जिल्हा क्रीडा अधिकारी (वर्ग एक), त्यांचे मदतीला तालुका क्रीडा अधिकारी (वर्ग २) क्रीडा अधिकारी, क्रीडा मार्गदर्शक, एक वरिष्ठ लिपिक, एक कनिष्ठ लिपिक आणि एक शिपाई अशी पदे आहेत.

संचालनालय स्तरावर नवीन योजना व आवश्यक तरतूद प्रस्तावित करून शासनास सादर करणे, राज्य व राष्ट्रीय स्तरावर क्रीडा विषयक उपक्रमांचे आयोजन करणे, विभागात व जिल्ह्यात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांवर नियंत्रण ठेवणे, त्याशिवाय जिल्हा / विभागाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाच्या प्रस्तावांची छाननी करून अनुदान मंजूर करणे, राज्य क्रीडा परिषदांच्या सभांचे आयोजन करणे, शारीरिक शिक्षण महाविद्या-लयांना निर्वाह अनुदान मंजूर करणे, बालवीर, वीरबालाराष्ट्रीय छात्र सेना, हे उपक्रम राबविण्यासाठी अनुदान देणे, युवक कल्याण विषयक प्रकल्प राबविणे, किंवा अनुदान देणे, बिगर विद्यार्थी युवकांकरिता राज्य स्पर्धांचे आयोजन करणे, राज्य संघटनांना राज्यात क्रीडा विषयक वातावरण निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे इत्यादी प्रकारची कामे संचालनालय स्तरावर पाहिली जातात.

विभागीय स्तरावर जिल्हा कार्यालयांना भेटी देणे, जिल्हा अथवा विभागात आयोजित क्रीडा स्पर्धात समन्वय ठेवणे, अनुदान दिलेल्या संस्थांना भेटी देऊन मार्गदर्शन करणे, राष्ट्रीय छात्र सेना कार्यालयातील नागरी कर्मचाऱ्यांवर संपूर्ण प्रशासकीय नियंत्रण ठेवणे, जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यां-कडून प्राप्त अनुदानाच्या प्रस्तावाची छाननी करून अनुदान मान्य करणे, विभागात क्रीडा व खेळ यांचा प्रचार व प्रसार करण्याचे प्रयत्न करणे इत्यादी प्रकारची कामे करण्यात येतात. सध्या मुंबई, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, नाशिक, अमरावती, पुणे व लातूर ही आठ विभागीय कार्यालये कार्यरत आहेत.

जिल्हा स्तरावर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे, मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, पंजीबद्ध संस्थांना व युवक संस्थांना अनुदानासाठी मार्गदर्शन करणे. संस्थेकडून अनुदानासाठी प्राप्त अर्जांची छाननी करून विभागीय उपसंचालकांकडे संचालनालयास सादर करणे, क्रीडा संस्था, युवक मंडळे, व्यायाम शाळा, शैक्षणिक संस्था यांना भेटी देणे, त्यांची तपासणी करणे व अनुदान मंजूर करणे. राज्य आणि केंद्र शासनाच्या योजना राबविण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे, जिल्ह्यात क्रीडा विषयक उपक्रम राबवून प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे अशा स्वरूपाची कामे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे सोपविलेली आहेत. ग्रामीण भागामार्फत विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी तालुका स्तरावर क्रीडा कार्यालय निर्माण करण्यात आली आहेत.

## २. शारीरिक शिक्षण

### प्रस्तावनात्मक

**२. राष्ट्रीय सुदृढता दल निदेशक आस्थापना**

केंद्र सरकारने मुलांमध्ये शारीरिक सुदृढता शिस्तबद्ध व स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे दृष्टीने १९५४ सालात, "राष्ट्रीय शिस्त योजना" या दलाची स्थापना केली. जास्तीत जास्त माध्यमिक शाळांना या योजनेचा फायदा मिळण्याच्या दृष्टीकोनातून या योजनेचा सन १९५८ मध्ये विस्तार करण्यात आला. या योजनेखाली लायक व्यक्तींची भरती करण्यात येऊन केंद्र सरकारने त्यांना प्रशिक्षण दिले व त्यांची विविध शाळांमध्ये "राष्ट्रीय सुदृढता दल निदेशक" म्हणून नेमणूक करण्यात आली. केंद्र सरकारचे निर्णयाप्रमाणे सदरहू राष्ट्रीय सुदृढता दल निदेशकांच्या पगाराचा पूर्ण खर्च देण्याच्या अटीवर निदेशकांना राज्य सेवेत सामावून घेण्याचे महाराष्ट्र शासनाने मान्य केले. केंद्र सरकारने सदरहू अट मान्य केली व त्याप्रमाणे सर्व राष्ट्रीय सुदृढता दल निदेशकांना राज्य सेवेत १ नोव्हेंबर १९७६ पासून सामावून घेण्यात आले.

एकूण १,२२० राष्ट्रीय सुदृढता दल निदेशकांसह सदर योजना केंद्र-शासनाकडून वर्ग झालेली आहे. या योजनेतील शेवटचा रा. सु. द. निदेशक डिसेंबर २००३ मध्ये सेवानिवृत्त झालेला आहे. सेवानिवृत्त रा. सु. द. निदेशक यांचे थकीत देयके, वेळोवेळी झालेल्या वेतन निश्चिती मधील दुरूस्त्या व प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाचा निपटारा तसेच वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन आदेशान्वये सेवानिवृत्तीचे सुधारित लाभ देणे इत्यादींबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत, १ सहाय्यक लेखाधिकारी, ६ कनिष्ठ लिपिक व १ शिपाई असे एकूण ८ कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध असून त्यांचे वेतन व भत्ते सदर योजनेंतर्गत काढण्यात येत आहे.

# ३. युवक कल्याण योजना

## प्रस्तावनात्मक

१५ ते ३५ वयोमर्यादितील युवक हा लोकसंख्येतील एक मोठा असा घटक असून त्यामध्ये प्रभावशाली व सुप्त गुणांची शक्ती आहे. या सामर्थ्याला योग्य संधी उपलब्ध करून दिली गेल्यास त्या त्या कार्याबद्दलची संयुक्तिकता व पाहण्याचा दृष्टिकोन समजावून देण्यास अधिक सोपे होईल, म्हणून राष्ट्र उभारणीच्या कार्यक्रमासाठी युवकांची शक्ती वापरण्याचा दृष्टिकोन समोर ठेवून युवकांच्या गरजांना प्राधान्य देणे हे महत्त्वाचे आहे.

हे सर्वमान्य आहे की, युवक कल्याण योजना ह्या युवकाच्या गरजा तसेच त्या समाजाच्या गरजा ह्यांचा पूर्ण विचार करून अशा प्रकारे आधारलेल्या असाव्यात की, ज्यामुळे युवकांचा वैयक्तिक व सामाजिक दृष्ट्या सर्वांगीण विकास होऊन ते राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहाशी एकरूप होऊ शकतील. युवकांचा उत्कर्ष हा विस्तृत राष्ट्रीय उद्दिष्ट, भावी काळाबद्दल अपेक्षा आणि जागतिक घडामोडीमधून उद्भवणारी आव्हाने ह्यांच्याशी निगडित असेल. युवक कल्याण कार्यक्रमाद्वारे युवकांचा शारीरिक विकास व सुदृढता शरीराच्या हालचालीमध्ये नैपुण्यता व पर्यायी व्यक्तिमत्त्वाचा विकास साधण्यास मदत व्हावी ही अपेक्षा आहे. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक पद्धतीचे एक अंतर्गत अंग म्हणून राहणे ही युवक कल्याण योजनेची जबाबदारी आहे. फक्त युवकांना सुसूत्रबद्ध आयोजित केलेल्या योजनांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे ज्यामुळे ते आपल्या जीवनातील आव्हानांना सर्वार्थपणे तोंड देऊ शकतील.

राज्याचे स्वतंत्र युवा धोरण हे दिनांक १४ जून २०१२ रोजी शासनाने घोषित केले असून त्यातील २० शिफारशींबाबत योजना निहाय निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

### (१) युवक केंद्र व इतर संस्थांना आर्थिक सहाय्य

राज्य सरकार सर्व स्तरावर युवक केंद्र/मंडळ स्थापन करण्याचे उत्तेजन देत आहे. याद्वारे युवक कल्याण कार्यक्रम उदा., ग्रामीण स्वच्छता, वैद्यकीय सहाय्य, युवक देवाण-घेवाण कार्यक्रम, युवक नेतृत्व प्रशिक्षण, मुलाखत तंत्र, राष्ट्रीय एकात्मता व सांस्कृतिक कार्यक्रम इ. प्रकारांचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

युवक केंद्र तसेच कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या पंजीबद्ध संस्थांना प्रतिवर्षी गतवर्षीच्या खर्चाच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रू. ५,०००/- यात जी कमी असेल इतके निर्वाह अनुदान तसेच एक किंवा अनेक युवक कल्याण कार्यक्रम आयोजनासाठी अंदाजे खर्चाच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रू. २५,०००/- इतके अनुदान देण्यात येते.

शासन निर्णय क्रमांक रायुदि १०९८/प्र. क्र. १३६/क्रीयुसे-३, दिनांक २८ डिसेंबर २०१३ व समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक रासुद/प्र. क्र. २१६/क्रीयुसे-१, दिनांक १ जानेवारी २००१ अन्वये युवकांचा सर्वांगीण विकास करणे आणि राष्ट्रीय व सामाजिक कार्यात सहभागी होण्यासाठी युवकांना उद्युक्त करण्याकरिता स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस दिनांक १२ जानेवारी राष्ट्रीय युवा दिन म्हणून प्रत्येक जिल्ह्यात साजरा केला जातो. तसेच १२ व १९ जानेवारी या कालावधीत युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये राष्ट्रीय पुरूषांचे तत्वज्ञान व शिकवण यावर भाषणे, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, संमेलन वक्तृत्व, समुहगान इत्यादी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते प्रति जिल्हा रू. ३,०००/- (अक्षरी रूपये तीन हजार फक्त) प्रमाणे युवा दिन व युवा सप्ताह आयोजनासाठी उपलब्ध करून दिले जातात.

### (२) समाजसेवा शिबिराचे आयोजन करणे

युवकांकरिता जिल्हास्तरावर समाजसेवा शिबीर आयोजित करणे हे या योजनेत अंतर्भूत आहे. राष्ट्राच्या मजबूत बांधणीत युवक हा महत्त्वाचा दुवा आहे आणि म्हणून त्यांना जीवनाची सत्यता पटवून सांगण्याची गरज आहे. याकरिता त्यांना योग्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. शहरी युवकांना ग्रामीण समस्यांची व जीवनाची आणि रचनात्मक कार्य करताना शारीरिक श्रमाची कल्पना देणे व युवकामध्ये ग्रामीण समस्येबाबत चर्चा घडवून आणणे हे समाजसेवा शिबिराचे उद्देश आहेत. समाजसेवा शिबीर विद्यार्थी व विद्यार्थेतर युवक-युवतींकरिता असावे. अशी शिबिरे शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळविणाऱ्या स्वयंसेवी युवक संघटनांद्वारे प्रत्येक जिल्ह्यात आयोजित करून शिबिरात खालील कार्यक्रमाचा अंतर्भाव असावा.

(अ) युवकांना शारीरिक श्रम व कठीण परिश्रमाचे महत्त्व पटेल असे रचनात्मक कार्य आयोजित करणे.

(ब) जीवनातील समस्येसंबंधी चर्चा घडवून आणणे.

(क) शिबिराच्या प्रत्येक दिवशी सकाळी शारीरिक कवायत व सायंकाळी खेळ आयोजित करणे.

(ड) सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

(इ) युवक कल्याणावर तज्ञांद्वारे व्याख्याने आयोजित करणे.

### (३) औरंगाबाद येथील युवक वसतिगृह चालविण्याचा खर्च

पर्यटन विभागाच्या ताब्यात असलेले औरंगाबाद येथील युवक वसतिगृह राज्य शासनाच्या क्रीडा विभागाच्या ताब्यात दिनांक १ एप्रिल १९८८ पासून देण्यात आले. या तरतुदीतून या वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरिता नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचे वेतन व भत्ते, कार्यालयीन खर्च, प्रवास खर्च इ. भागविण्यात येतो. केंद्र शासनाकडून वसतिगृह प्रमुख यांच्या मानधनावरील खर्चासाठी अनुदान देण्यात येते. राज्यातील अथवा परदेशातील युवकांना येथे अल्प दरात निवास व भोजन व्यवस्था, मनोरंजनात्मक ग्रंथालय इ. उपलब्ध करण्यात आले आहेत.

**(४) व्यापक सहभागासाठी विविध योजना कार्यक्रम राबविणे (रोडरेस/सायकल शर्यत)**

राज्यातील विविध वयोगटातील विद्यार्थी व युवकांमध्ये शारीरिक क्षमता व खेळाची आवड निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खेळाडू सहभागी करून घेता येतील असे कार्यक्रम आयोजित करून जिल्हा व तालुका स्तरावर विविध वयोगटातील युवकांसाठी लांब पल्ल्याच्या धावण्याच्या शर्यती/सायकल शर्यती आयोजित करण्यात येतात. या स्पर्धांचा प्रामुख्याने उपयोग ग्रामीण व आदिवासी भागातील युवक विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेऊन त्यांच्यात शारीरिक सुदृढता वाढविणे हा प्रमुख उद्देश आहे.

तालुका व जिल्हा स्तरावर आयोजनासाठी प्रत्येक तालुक्याला मॅरॅथॉन शर्यतीसाठी रू. १,५०० व सायकल शर्यतीसाठी रू. ५०० तर जिल्हा स्तरासाठी मॅरॅथॉन शर्यतीच्या आयोजनासाठी रू. ४,००० व सायकल शर्यतीसाठी रू. १,४०० याप्रमाणे तरतूद उपलब्ध करून देण्यात येते.

**(५) ग्रामीण भागात युवक कल्याण उपक्रमांचा विस्तार**

युवक कल्याण कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रमांत जास्तीत जास्त युवकांना सहभागी करून त्यांचा सर्वांगीण विकास घडविण्याच्या दृष्टीने तसेच त्यांच्यात असलेल्या गुप्त गुणांच्या वाढीसाठी विविध स्तरातील १५ ते ३५ गटातील युवकांसाठी स्पर्धात्मक उपक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने ही योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.

या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येतात. राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रोन्नती, सामाजिक विकास व युवकांशी निगडित असलेल्या विषयांवर निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करून प्रथम तीन क्रमांकाच्या युवकांना रोख पारितोषिक देण्यात येते.

# ४. क्रीडा व खेळ

### (१) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतुन आर्थिक सहाय्य.

महाराष्ट्र राज्यात क्रीडा व खेळाच्या विकासासाठी विविध स्तरावर कार्यरत असलेल्या पंजीबद्ध क्रीडा संस्था, मंडळे तसेच इतर कार्यक्रमाबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीमधून आर्थिक सहाय्य करण्याची योजना कार्यान्वित आहे.

**या योजने अंतर्गत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी अनुदान.**

(अ) अधिकृत राज्य स्पर्धेच्या आयोजनासाठी पुरूष व महिला खेळाडूंच्या एकत्रित स्पर्धेसाठी रू. १·०० लक्ष अनुदान देण्यात येते. तसेच पुरूष व महिलांच्या एकाच खेळाच्या स्पर्धा स्वतंत्रपणे आयोजित केल्यास अनुदानाची मर्यादा रू. ५०,००० पर्यंत देण्यात येते.

(ब) अधिकृत राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या आयोजनासाठी पुरूष व महिला खेळाडूंच्या एकत्रित स्पर्धेसाठी रू. २·०० लक्ष अनुदान देण्यात येते. तसेच पुरूष व महिलांच्या एकाच खेळाच्या स्पर्धा स्वतंत्रपणे आयोजित केल्यास अनुदानाची मर्यादा रू. १·०० पर्यंत देण्यात येते.

### (२) राज्य संघटनांना प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्यासाठी वित्तीय सहाय्य.

दरवर्षी विविध राज्य संघटनांच्या वतीने किशोर, किशोरी व वरिष्ठ गटाचे संघ राष्ट्रीय स्पर्धांसाठी पाठविले जातात. राज्य संघटनांतील खेळाडूंची राज्य स्तरीय स्पर्धांतून अथवा निवड चाचणीद्वारा निवड केली जाते. राज्य संघटनातील खेळाडूंमध्ये सांधिक भावना व त्यांच्यात परस्पर सामंजस्य निर्माण होण्याच्या हेतूने राष्ट्रीय स्पर्धांत सहभागी होणाऱ्या राज्य संघातील खेळाडूंसाठी प्रशिक्षण शिबीर आयेजित करणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत मान्यता प्राप्त संघटनांना राष्ट्रीय स्पर्धांत जाण्यापूर्वी किमान ७ दिवसांचे शिबीर आयोजनासाठी प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रू. १५,००० यापैकी जो कमी असेल तो खर्च आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येतो. संघटनांनी खेळाडूंचा आणि मार्गदर्शकांचा निवास, प्रवास, भोजन, किरकोळ क्रीडा साहित्य, क्रीडांगण दुरुस्ती इत्यादींवर खर्च करणे आवश्यक आहे.

### (३) खेळांच्या राज्य संघटनांना प्रोत्साहनात्मक अनुदान.

विविध खेळांच्या राज्य संघटनांमार्फत राष्ट्रीय स्पर्धेकरीता पाठविण्यात येणाऱ्या संघांनी संपादन केलेल्या कामगिरीचे श्रेय खेळाडूंबरोबर संबंधित खेळाच्या राज्य संघटनेच्या कार्यावर अवलंबून असते. संबंधित राज्य संघटनेच्या कार्याचा गौरव म्हणून अशा राज्य संघटनांना प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याचे या योजनेत अंतर्भूत आहे.

या योजने अंतर्गत वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील सांघिक खेळामध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक संपादन करणाऱ्या संबंधित खेळांच्या राज्य संघटनांना अनुक्रमे रू. १५,०००, रु. १०,००० व रू. ५,००० तसेच वैयक्तिक खेळांच्या क्रीडा प्रकारात एक किंवा अनेक सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक संपादन करणाऱ्या राज्य संघटनांना अनुक्रमे रू. ३,०००, रू. २,००० व रू. १,००० इतके प्रोत्साहन अनुदान, प्रशिक्षण आयोजन, क्रीडा साहित्य खरेदी इत्यादींसाठी देण्यात येते.

### (४) अधिकृत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत राज्याचा संघ सहभागी होण्यासाठी राज्य संघटनांना आर्थिक सहाय्य.

महाराष्ट्रातील गुणवान खेळाडूंना विविध खेळांच्या राष्ट्रीय स्पर्धांत राज्याचे प्रतिनिधित्व करणे सुलभ व्हावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने सदरहू योजना कार्यान्वित आहे.

या योजने अंतर्गत प्रवास भाडे, गणवेश, व ट्रॅकसूट इ. साठी खालीलप्रमाणे अनुदान दिले जाते.

(अ) प्रवास खर्च-सवलतीच्या दराने दुसऱ्या वर्गाचे रेल्वेचे भाडे किंवा राज्य परिवहन महामंडळाचे सवलतीचे प्रत्यक्ष भाडे.

(ब) हातखर्ची भत्ता-प्रत्येक खेळाडू व व्यवस्थापक/मार्गदर्शक यांना दर दिवशी प्रत्येकी रू. ४० (चाळीस) प्रमाणे, प्रवास व प्रत्यक्ष स्पर्धेच्या कालावधीसाठी.

(क) खेळाचा गणवेश व स्पोर्टस् कीट-राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना प्रत्येकी रू. १५० (एकशे पन्नास) प्रमाणे.

(ड) ट्रॅकसूट-राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूस रू. ५०० (पाचशे) प्रमाणे देण्यात येते.

**अनुदानासाठी मान्य केलेले खेळ खालीलप्रमाणे आहेत.**

(१) ॲथलेटिक्स, (२) ॲक्रेटिक्स, (३) आर्चरी, (४) आट्यापाट्या, (५) बॅडमिंटन, (६) बास्केटबॉल, (७) बिलीयर्डस्, (८) बॉलबॅडमिंटन, (९) ब्रीज, (१०) बॉक्सींग, (११) बॉडीबिल्डींग, (१२) क्रिकेट, (१३) सायकलिंग, (१४) कॅरम, (१५) बुद्धीबळ, (१६) फुटबॉल, (१७) फेन्सींग, (१८) जिम्नॅस्टिक्स, (१९) हँडबॉल, (२०) हॉकी, (२१) ज्युदो, (२२) कराटे (२३) कबड्डी, (२४) खो-खो, (२५) कॅनोईंग-कयाकिंग, (२६) मल्लखांब, (२७) पॉवरलिफ्टिंग, (२८) रायफल शूटींग, (२९) रिंग, टेनिस, (३०) सॉफ्टबॉल, (३१) शूटींगबॉल, (३२) टेबलटेनिस (३३) टेनिस, (३४) व्हॉलीबॉल, (३५) कुस्ती, (३६) वेटलिफ्टिंग, (३७) यॉटिंग, (३८) रोलर स्केटिंग, (३९) रोईंग, (४०) हॅंगग्लायडिंग, (४१) सायकलपोलो, (४२) स्क्वॅश, (४३) तायक्वांदो, (४४) टेनिस बॉल (क्रिकेट), (४५) वुशू, (४६) योगा, (४७) बेसबॉल, (४८) सिकई, (४९) टग ऑफ वॉर, (५०) किकबॉक्सींग, (५१) रोलबॉल, (५२) सेपक टकरा.

### (५) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत प्रतीवर्षी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याची योजना कार्यान्वित असून यामध्ये राज्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू, साहसी उपक्रम, दिव्यांग खेळाडू, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, मार्गदर्शक यांना पुरस्कार देण्यात येतो. महिला क्रिडा मार्गदर्शक यांचेसाठी जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार व जेष्ठ क्रीडा महर्षीकरीता शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

मान्यता प्राप्त खेळांच्या अधिकृत राज्य संघटनेमार्फत विहित खेळाच्या आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावरील वरिष्ठ गटातील पदक विजेते पुरूष व महिला खेळाडू, साहसी उपक्रम, दिव्यांग खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक/ महिला मार्गदर्शक यांचे विहित नमुन्यातील अर्ज संबंधित राज्य संघटनेच्या कार्यकारीणीच्या ठरावासह वैयक्तीक रित्या अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा लागतो. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www. maharashtra.gov.in)) वर उपलब्ध आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर शासन निर्णय क्रमांक-शिक्षु-२०२३/प्र.क्र. १८८/क्रीयुसे-२, दि. २९ डिसेंबर, २०२३ अन्वये उपलब्ध आहे.

**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराचे प्रकार व त्यांची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

**शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार :**

ज्येष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा क्षेत्राशी संबंधित अशा वयाच्या ६० वर्षावरील व्यक्तींनी क्रीडा क्षेत्रासाठी आपले सर्वस्व पणाला लावून आपले जीवन क्रीडा विकासासाठी व्यतीत केले आहे अशा ज्येष्ठ क्रीडा महर्षीचा गौरव करण्याचा दृष्टीने शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या करीता नामांकने मागविण्यात येत नसून अशा ज्येष्ठ क्रीडा महर्षीची माहिती ही जिल्हा क्रीडा अधिकारी, विभागीय उपसंचालक हे संचालनालयास सादर करून प्राप्त माहिती संकलीत करण्यात येवून पुरस्कार समितीसमोर सादर करण्यात येईल.

**पुरस्काराचे स्वरुप :** गौरव पत्र, मानचिन्ह व रोख रू. ५.०० लक्ष. ब्लेझर

**उत्कृष्ठ क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार/जिजामाता पुरस्कार :**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये जे खेळाडू सहभागी होतात व प्राविण्य मिळवतात, अशा खेळाडूंना घडविण्याऱ्या क्रीडा मार्गदर्शकांचा गौरव करण्याच्या दृष्टीने शासन निर्णयामध्ये नमूद असलेल्या क्रीडा प्रकारांचे चार गटातील उत्कृष्ट ठरणाऱ्या चार मार्गदर्शकांना प्रतीवर्षी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यामध्ये महिला क्रीडा मार्गदर्शकास जिजामाता पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. तसेच दिव्यांग खेळाडूंना घडविणारा मार्गदर्शकास एक पुरस्कार देण्यात येईल.

**पुरस्काराचे स्वरुप :** गौरव पत्र, मानचिन्ह व रोख रू. ३.०० लक्ष, ब्लेझर

**राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम) :**

जल, हवा, जमीन या तीन बाबीत स्वतंत्र पुरस्कार देण्यात येतो.

खाडी/समुद्र पोहणे, शिडाच्या होडीतून समुद्र प्रवास करणे, गिर्यारोहण, प्रस्तरारोहण, सायकलवर जग प्रवास करणे, पॅराग्लाईडींग/पॅराजंपीग इ. या साहसी उपक्रमामध्ये सहभागी होवून आंतरराष्ट्रीय दर्जाची कामगिरी करणाऱ्या ३ व्यक्तीस प्रतीवर्षी राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम) देण्यात येतो.

**पुरस्काराचे स्वरुप :** गौरव पत्र, मानचिन्ह व रोख रू. ३.०० लक्ष, ब्लेझर

**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडू :**

क्रीडा क्षेत्रामध्ये विशेष उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंचा गौरव म्हणून पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. ४५ क्रीडा प्रकार पुरस्कारासाठी ग्राह्य धरण्यात आले आहेत.

**पुरस्काराचे स्वरुप :** गौरव पत्र, मानचिन्ह व रोख रू. ३.०० लक्ष, ब्लेझर

**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) :**

क्रीडा क्षेत्रामध्ये विशेष उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील दिव्यांग खेळाडूंचा गौरव म्हणून पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

**पुरस्काराचे स्वरुप :** गौरव पत्र, मानचिन्ह व रोख रू.३.०० लक्ष, ब्लेझर

**(६) (१) शालेय क्रीडा स्पर्धा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत शालेय क्रीडा स्पर्धामध्ये ७८ खेळांचे, आयोजन तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय पातळीपर्यंत करण्यात येते. तालुकास्तरीय, १० क्रीडा स्पर्धांचा व जिल्हास्तरीय, विभागस्तरीय व राज्यस्तरीय ४९ क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाचा खर्च या योजनेमधून भागविण्यात येतो. राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंचा निवास, भोजन, पंच निवडसमिती सदस्य यांचा दैनिक भत्ता व प्रवास भत्ता या वरील खर्च, तसेच स्पर्धेच्या अनुषंगाने आवश्यक खर्च या योजने अंतर्गत करण्यात येतो.

**(२) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी राज्याचा संघ पाठविणे**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे आयोजित शालेय, क्रीडा स्पर्धेमध्ये व इतर क्रीडा स्पर्धेमध्ये राज्याचे संघ एकूण-८९ खेळांमध्ये ११, १४, १७ व १९ या वयोगटात सहभागी होतात. तसेच राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचा संघ होतो. यात सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे ५ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येते. सदर शिबिराचा खर्च, खेळाडू, मार्गदर्शक, व्यवस्थापक यांचा प्रवास खर्च, निवास व भोजन खर्च त्याचप्रमाणे खेळाडूंना व क्रीडा मार्गदर्शकांना गणवेष व ट्रॅकसूट इत्यादीबाबतचा खर्च व राष्ट्रीय स्पर्धेच्या अनुषंगाने आवश्यक खर्च या योजनेंतर्गत करण्यात येतो.